2018-19 Marathi Me

1S8

HH1

D.El.Ed. Examination
JUNE, 2019
Second Year (2016 Revised Syllabus)
SOCIAL STUDY PEDAGOGY
(Marathi Medium)
Time : 3.00 to 5.00 Hrs.

Date : 15/6/2019

(4 Pages)

Max. Marks : 40

सूचना :– (1) या प्रश्नपत्रिकेत इतिहास अध्ययन-अध्यापनशास्त्र (भाग-1 प्रश्न क्र. 1 ते 4) व भूगोल अध्ययन-अध्यापनशास्त्र (भाग-2 प्रश्न क्र. 5 ते 8) असे दोन भाग आहेत.

(2) उत्तरपत्रिकेत कोणताही एक भाग पूर्ण लिहिल्यानंतरच दुसरा भाग सोडवावा.

भाग-1

इतिहास अध्ययन-अध्यापनशास्त्र (20 गुण)

1. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून विधान पुन्हा लिहा : 4

(1) पहिल्या इतिहासकाराचा मान .................................. यास मिळतो.

(2) शिवकाल हा संबोध .................................. या संबोधाच्या वर्गीकरण प्रकारातील आहे.

(3) निबंधवजा प्रश्नाची सुधारलेली आवृत्ती म्हणजे .................................. प्रश्नप्रकार.

(4) मूल्यमापन तंत्राचा उदय .................................. या देशात झाला.

2. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा :** 6

(1) इतिहास विषय संरचनेची आकृती काढा.

(2) आधार पद्धतीची उपयुक्तता स्पष्ट करा.

(3) क्षेत्रभेट पद्धतीचे **चार** फायदे सांगा.

3. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा :** 6

(1) प्रकल्प पद्धतीची व्याख्या सांगून इतिहास विषयात प्रकल्प पद्धतीची उपयुक्तता स्पष्ट करा.

**किंवा**

नाट्यीकरण पद्धती म्हणजे काय ? इतिहास अध्यापनात नाट्यीकरण पद्धतीचे फायदे लिहा.

(2) पडताळासूची म्हणजे काय ? इतिहास विषयाच्या मूल्यमापनात पडताळासूचीचा वापर कसा कराल ? सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

इ. 6वी ते 8वी पैकी कोणत्याही **एका** इयत्तेच्या इतिहास विषयाच्या 20 गुणांच्या घटकचाचणीसाठी संविधान तक्ता तयार करा.

4. **खालील प्रश्नाचे उत्तर *200* ते *250* शब्दांत लिहा :** 4

इयत्ता 7वीं च्या नागरिकशास्त्र विषयाच्या घटकातून तुम्ही विद्यार्थ्यांमध्ये कोणत्या जाणिवा निर्माण कराल ? सोदाहरण लिहा.

**किंवा**

इतिहासाच्या पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करताना कोणते निकष वापराल ? उदाहरणासह लिहा.

भाग-2

## भूगोल अध्ययन-अध्यापनशास्त्र (20 गुण)

5. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा : 4

(1) हवामानाचा विचार करताना भूरूपशास्त्राचा विचार करावा लागतो.

(2) सागरी प्रवाह हे विषुववृत्तापासून उत्तर व दक्षिण ध्रुवांच्या दरम्यान वक्राकार दिशेने वाहतात.

(3) एका नैसर्गिक प्रदेशात एकच राजकीय भूभाग येतो.

(4) भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) या प्रणालीचा वापर सर्वप्रथम अमेरिकेत केला.

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा : 6

(1) चर्चातंत्राचा भूगोल अध्यापनात उपयोग करताना कोणत्या पायऱ्यांचा अवलंब कराल ?

(2) सहलीला जाताना भूगोल शिक्षक म्हणून तुम्ही कोणती पूर्वतयारी कराल ?

(3) भूगोल विषयासाठी वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करा.

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा : 6

(1) भूगोल विषयाची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

पाठ्यक्रम व अभ्यासक्रम यांची तुलना करा.

(2) आकारिक मूल्यमापन म्हणजे काय ? आकारिक मूल्यमापनाची कोणतीही दोन साधने सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

संकलित मूल्यमापन म्हणजे काय ? त्याची दोन साधने सोदाहरण स्पष्ट करा.

8. **पुढील प्रश्नाचे उत्तर *200* ते *250* शब्दांत लिहा :** 4

नकाशावाचताना विद्यार्थ्यांकडून कोणकोणत्या चुका होतात ? प्राथमिक शिक्षक या नात्याने त्या चुका टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराल ?

**किंवा**

अध्यापन पद्धती म्हणजे काय ? इयत्ता 6वी चा कोणताही एक घटक पदार्थ पद्धतीने कसा शिकवाल सविस्तर लिहा.